नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | अंक - १२६ | वार मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 3rd | Issue - 126 | Blow- Tuesday Date 23 September 2025 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सीना नदीच्या पाण्यात २ लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग

## सोलापूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती; शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे आणि सर्वसामान्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दुष्काळाचे चटके सहन करणारा मराठवाडा (चरीरींहुरवर ठरळप) सध्या ओल्या दुष्काळानं ओलाचिंब झाला आहे. इतका इतका पाऊस झाला की मराठवाड्याच्या नाकातोंडात पाणी गेले आहे आणि जनजीवन ठप्प झाले आहे. दसऱ्याला कापणीला आलेल्या पिकांचा डोळ्यांसमोर चिखल झाला आणि जागेपणी पाहिलेली स्वप्न वाहून गेली. ज्या काळ्या आईनं आजवर भूक भागवली ती मातीही या पावसानं खरडून गेलीय. सोलापूर, धाराशीव, बीड, जालन्यात पावसाचं थैमान पाहायला मिळालंय. ज्या मराठवाड्याला दुष्काळात रेल्वेनं पाणी पोहोचवावं लागलं होतं. तिकडे आता हेलिकॉप्टरमधून लोकांचं रेस्क्यू करण्याची वेळ आली आहे. खरीपाचा हंगाम आधी दुबार पेरण्यांनी वाया गेला आणि आता आस्मानी संकटानं डोळ्यांना धारा लागल्या आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून बहिणींना लाडकी करायचा घाट घालणाऱ्या सरकारला बळीराजाची ही व्यथा दिसेल? बळीराजा लाडका व्हावा यासाठी कोणती व्यवस्था आपलं सरकार उभं करू शकणार आहे? 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा' असं म्हणत इथला प्रत्येक जण चिवटपणे जगतो आहे. पण सरकारला आता केवळ पाठीवर हात ठेवून लढ म्हणता येणार नाही आणि ओला दुष्काळ जाहीर करून सढळ मदत देण्याचं कर्तव्य सरकारला नाकारता येणार नाही.






काल रात्री बार्शीतल्या आगळगाव परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे चांदणी नदीला महापूर आला असून काटेगाव ते चारे रस्त्यावरील पूल वाहून गेला आहे. या घटनेमुळे मसोबाचीवाडी, बांगरवाडी, चारे, पाथरी या सह पूर्व भागातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. दररोज शेकडो शेतकरी या पुलावरून आपल्या शेतात ये-जा करीत होते. पूल वाहून गेल्याने शेतकऱ्यांना शेतातील कामकाजासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच शाळकरी मुले, रुग्ण व नागरिकांच्या दैनंदिन हालचाली ठप्प झाल्या आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाला तातडीने पर्यायी व्यवस्था करून देण्याची मागणी केली आहे.

सोलापुरातील सीना नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सीना नदीच्या पात्रात २ लाख क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गांवरील लांबोटी जवळील पूल पाण्याखाली जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सीना-कोळेगाव, खासापुरी आणि चांदनी प्रकल्पातून सीना नदीमध्ये सुमारे २ लाख क्यूसेक पाणी सोडले जात असल्याने नदी पात्रातील माढा, मोहोळ आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावात पाणी शिरले आहे.

**नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

सीना नदीच्या प्रवण क्षेत्रामध्ये रात्रभर मुसळधार पाऊस झाल्याने सीना नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली असून सीना नदीवरील बापले, अनगर, मालिकपेठ, आष्टे हे सर्व बंधारे पाण्याखाली गेले आहेत. सीना नदीत सुरु असलेल्या प्रवाहामुळे आज सोलापुरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सीना नदीच्या काठावरील गावांना आज सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सीना नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून असून अनेक गावात नदीचे पाणी शिरले असून उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे गावातील पूल काही वेळात पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे.

माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या गावांमध्ये पाण्याचा वेढा पडला आहे. उंदरगाव, खैराव ,वाकाव यासह अनेक गावांना पाण्याचा वेढा पडल्याने रात्रभर नागरिकांचे स्थलांतर सुरू आहे. तर मोहोळ तालुक्यातील भोयरे गावात कोल्हापूर पद्धतीचा बंधारा पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद झाली आहे.

### पावसाबाबत हवामान खात्याचा महत्त्वाचा अलर्ट

# जोर आणखी वाढणार; २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान मूसळधार पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात सध्या काही भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबई, पुणे, बीड, धाराशिव आसपासच्या भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. या आठवडाभरात राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला. तर शुक्रवारनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. राज्यभरात पावसाने कहर केला आहे, संपूर्ण मराठवाडा पाण्याखाली गेला असून मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचं नुकसान झालं आहे. अशातच आणखी एक आठवडा पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.





बंगालच्या उपसागरामध्ये सध्या कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून परिणामी राज्यात पुढील तीन दिवसांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यानंतर बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, राज्यात दि. २६ ते २८ सप्टेंबर यादरम्यान काही भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाने धुमाकूळ घातल्याने पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

बंगालच्या उपसागरावर तयार झालेलं कमी दाबाचं क्षेत्र विरलं असलं, तरी त्याचा परिणाम अजूनही काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या स्वरूपात जाणवत आहे. दरम्यान, येत्या बुधवारी (दि. २४) पुन्हा एक नवीन कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाचे सानप यांनी वर्तवला आहे. मॉन्सून पुन्हा एकदा सक्रिय होत असल्यामुळे त्याच्या परतीच्या प्रवासाबाबत सध्या अंदाज बांधता येत नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. मात्र, हे कमी दाबाचं क्षेत्र विरल्यानंतर मॉन्सूनचा परतीचा प्रवास सुरू होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी नमूद केलं.लदरम्यान, मॉन्सूनने सोमवारी गुजरात, राजस्थान, हरियाणा व पंजाबच्या काही भागांमधून परतला आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजनुसार मंगळवारी (दि. २३) कोकण, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र व विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर पुढील दोन ते दिवसांत राज्यात बहुतांश जिल्ह्यांत मेघगर्जनेसह तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

बाहेर पडताना काळजी घ्या

- राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. अंदाजानुसार दुपारनंतर मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता असून, २६ तारखेपासून कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव अधिक जाणवेल. - विशेषतः विदर्भ व मराठवाड्यातील पूर्व व दक्षिणेकडील भागांत दुपारनंतर पावसात वाढ होण्याची शक्यता आहे. २७ सप्टेंबर रोजी विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांत पाऊस वाढू शकतो. यातील काही भागांत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर २८ तारखेला राज्याच्या पश्चिमेकडील भागांत पावसाचा जोर टिकून राहील, असा अंदाज आहे. - सध्या नवरात्रोत्सव सुरू असल्याने सायंकाळी बाहेर पडताना नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

# मराठवाड्यातील अतिवृष्टीचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आढावा

**राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाला तातडीने मदत पुरवण्याचे, पुराच्या वेढ्यात अडकलेल्या नागरिकांची त्वरित सुटका करण्याचे निर्देश**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे : मराठवाड्यातील अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष ठेवून असून, मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करून सुरक्षितस्थळी हलविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच उपमुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव व संचालकांशी बोलून त्यांना सूचनाही दिल्या.

**मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून साधला संवाद**

मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पूर परिस्थितीचा आढावा घेऊन लोकांना तत्काळ मदत पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला.

दरमान धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील ढगपिंपरी गावातील नागरिक पूर परिस्थितीत अडकल्याचे त्यांना समजले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून तत्काळ एनडीआरएफच्या मदतीने हेलिकॉप्टर पाठवून पुराच्या वेढ्यात अडकलेल्या नागरिकांना तातडीने एअरलिफ्ट करून सुरक्षितस्थळी नेण्याचे निर्देश दिले. तसेच कोणतीही मदत लागल्यास तत्काळ आपल्याशी संपर्क साधावा आणि वेळोवेळी पूर परिस्थितीची माहिती आपल्याला द्यावी असेही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

**शाळांना सुट्टी जाहीर; अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली**

**राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती गंभीर**

# अतिवृष्टीने झोडपले, मराठवाड्यातील अनेक गावे पुराच्या विळख्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसामुळे (चरहरीरिर्हीर ठरळप) पूरस्थिती गंभीर झाली आहे. विशेषः मराठवाड्यातील (चरीरींहुरवर) अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पुराच्या पाण्याने (थशरींहशी णविरींश) अनेक गावांना वेढा घातल्याचे चित्र आहे. दिवसागणिक अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे भयावह वास्तव समोर येत आहे. तर या पावसाचा (ठरळप णविरींश) सर्वाधिक फटका बळीराज्याला बसला आहे. खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेली उभे पीक पावसाने अक्षरशः मातीमोल केले आहे. परिणामी शेतकरी आता सरकारच्या मदतीकडे आस लावून आहे. अशातच आज देखील पावसाची स्थिती कायम असल्याचा इशारा देण्यात आला आहे. परिणामी बीड, सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. चरहरीरिर्हीर ठरळप




दरम्यान, बीड जिल्ह्यात काल (२२ सप्टेंबर) दिवसभर विश्रांती घेतलेल्या पावसाने मध्यरात्री पुन्हा एकदा दमदार पावसाने हजेरी लावली. या पावसाने बीड शहरातील बिंदुसरा नदीने रौद्ररूप धारण केले आहे. शहराला पाणीपुरवठा करणारे बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. दरम्यान नदीच्या वाढलेली पाणी पातळी पाहता प्रशासनाने सतर्कतेचा इशारा नागरिकांना दिला आहे. तर अनेक भागात पुरात अडकलेल्या नागरिकांना छऊठऋ च्या मदतीने बाहेर काढण्यास यश आले आहे. तर पूर परिस्थिती पाहता प्रशासनाने शाळा महाविद्यालय सुट्टी जाहीर केली आहे.

जालना जिल्ह्यातही अतिवृष्टी झाली, जिथे अनेक नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील वाघोडा गावात जोरदार पाऊस झाला, तर कल्याणमधील वीजप्रकल्प ओव्हरफ्लो झाला. लातूरमध्येही मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. ज्यामुळे चौदा प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. पुराच्या पाण्यामुळे जनजीवनासोबतच शेतीपिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देणार असल्याची घोषणा केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उत्तर सोलापूर, माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी आणि दक्षिण सोलापूर या तालुक्यातील ग्रामीण भागात असणाऱ्या सर्व शाळांना व महाविद्यालयांना आजची सुट्टी जाहीर केली आहे. तसेच वाढत्या पावसामुळे आणि पूर्व परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी आवश्यक अशी काळजी घेण्याचे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

२६ सप्टेंबर रोजी विदर्भ आणि मराठवाड्याच्या पूर्व व दक्षिणेकडील भागांमध्ये दुपारनंतर पावसात वाढ होईल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यानंतर २७ सप्टेंबरला विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसाची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज आहे. यावेळी काही ठिकाणी मुसळधार स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे.

२८ सप्टेंबरला राज्याच्या पश्चिम भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहू शकतो. त्यामुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातील शेतकरी तसेच नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. यासोबतच कृषी विभागानेही शेतकऱ्यांना सूचना दिल्या आहेत. काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, अशी सूचना कृषी विभागाने केली आहे.

## संपादकीय....

### पाऊस थांबेना

राज्यात सध्या काही भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबई, पुणे, बीड, धाराशिव आसपासच्या भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. या आठवडाभरात राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला. तर शुक्रवारनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. राज्यभरात पावसाने कहर केला आहे, संपूर्ण मराठवाडा पाण्याखाली गेला असून मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचं नुकसान झालं आहे. अशातच आणखी एक आठवडा पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरामध्ये सध्या कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून परिणामी राज्यात पुढील तीन दिवसांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यानंतर बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, राज्यात दि. २६ ते २८ सप्टेंबर यादरम्यान काही भागात मुसळधार पावसाची शक्यता नुकतीच वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाने धुमाकूळ घातल्याने पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बंगालच्या उपसागरावर तयार झालेलं कमी दाबाचं क्षेत्र विरलं असलं, तरी त्याचा परिणाम अजूनही काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या स्वरूपात जाणवत आहे. दरम्यान, येत्या बुधवारी (दि. २४) पुन्हा एक नवीन कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाचे सानप यांनी वर्तवला आहे. मॉन्सून पुन्हा एकदा सक्रिय होणार आहे.

# प्रवीण बागडे यांना 'प्रबुद्ध साहित्यरत्न' पुरस्कार : समाजाभिमुख लेखणीचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : साहित्य हे केवळ भावनांचे चित्रण नसते, तर ते समाजाला दिशा देणारे, विचारांना चालना देणारे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे सामर्थ्यवान साधन असते. या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लेखन करणारे साहित्यिक प्रवीण बागडे यांना यंदाचा 'प्रबुद्ध साहित्यरत्न पुरस्कार' नांदेड येथे झालेल्या दैनिक प्रबुध्द परिवार या वर्तमानपत्राच्या १६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सन्मान सोहळयात प्रदान करण्यात आला. श्री. बागडे यांच्या लेखनात केवळ भाषेची समृद्धी दिसून येत नाही, तर त्यांच्या प्रत्येक लेखात माजाच्या वेदना, संघर्ष आणि परिवर्तनाची आर्त हाक ऐकू येते. जात, धर्म, वर्ण यांच्या पलीकडे जाऊन समानतेचा विचार, उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याची तळमळ, तसेच तरुण पिढीला जागृत करणारे विचार हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्यांचे लेखन आजच्या काळात अधिक परिणामकारक ठरत आहे.

आजच्या धावपळीच्या, बाजारपेठेच्या आणि स्वार्थाच्या साहित्य प्रवाहातही प्रवीण बागडे यांसारखे साहित्यिक समाजहिताची ज्योत जिवंत ठेवतात, हीच खरी साहित्यिक परंपरेची ताकद आहे. त्यांची लेखणी हा केवळ शब्दांचा खेळ नाही, तर वाचकांच्या मनात परिवर्तनाची ठिणगी पेटवणारा दीपस्तंभ आहे. 'प्रबुद्ध साहित्यरत्न' पुरस्काराने प्रवीण बागडे यांच्या लेखनाचा गौरव तर झाला आहेच, पण त्याचबरोबर समाजपरिवर्तनासाठी कार्यरत असलेल्या सर्वच लेखकांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे. पुरस्कार स्वीकारताना प्रवीण बागडे यांनी भावना व्यक्त करतांना हा पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर जबाबदारी आहे. लेखणी ही वैयक्तिक अभिव्यक्तीची साधने नाही, ती समाजातील आवाज दाबल्या गेलेल्या लोकांचे प्रतिनिधित्व करणारी ताकद आहे. या ताकदीचा उपयोग परिवर्तनासाठी करण्याचा प्रयत्न पुढेही सुरू राहील. कार्यक्रमाला अनेक नामवंत साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळ्यांच्या गजरात प्रवीण बागडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थितांनी हा सन्मान केवळ एका साहित्यकाराचा नसून संपूर्ण समाजाभिमुख लेखनाचा असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी विशेषंकाचे प्रकाशन व साहित्यीक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन भदंत शिलरत्न यांच्या हस्ते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हयाचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दैनिक प्रबुध्द परिवार वृत्तपत्राचे मुख्य संपादक व ऑल इंडीया संपादक संघ, मराठवाडा चे अध्यक्ष संजय खाडे व आभार प्रदर्शन उपसंपादक गौतम कदम यांनी केले.




# पंढरपुरात जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई

**५ लाख ४३ हजार तीनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २२/९/२०२५ सहा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे, पंढरपूर उपविभाग पंढरपूर, यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली पंढरपूर शहरातील मोहेजा भारतीय जवळ , डोंबे गल्ली अवैद्य जुगार चालू असल्याची माहिती. मिळाल्याने आम्ही सहा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे पंढरपूर उपविभाग पंढरपूर,व/पोस/महादेव पिसाळ असे पंढरपूर शहर पोलीस ठाण्यास. दिनांक २२/९/२०२५ ठाणे दैनंदिन नोंद.०२/२०२५ नोंद करून आमच्यासह दोन पोलीस पथकासह सोबत पंढरपूर च्या मारुती जवळ, डोंबे गल्ली येथील एका खोलीत कवयितरित्या जुगार खेळत असलेल्या या ठिकाणी छापा कारवाई केली आहे.

पंढरपूर शहरातील भुईचा मारुती मंदिराजवळ, डोंबे गल्ली येथील रोहित उर्फ लाला पानकर यांच्या शेजारी असलेल्या बोळातून आत गेल्यावर एका खोलीत १३ इसम ५२ पत्त्याच्या डावावर पैशाची पैज लावून जुगार खेळत असताना दिसले. सदर ठिकाणी ४२ इंची टीव्ही वरती सीसीटीव्ही फुटेज निरीक्षण. करिता वापर करण्यात आलेल्या, खालीमध्ये गाद्या खुर्च्या, जुगार खेळाची इतर साहित्यही होते. पोलीस पथकास सीसीटीव्हीचे फुटेज पाहून सदर तेरा इस्म पैकी नऊ विषम येथून पळून गेली व०४ इसम मिळून आले.

सदर खोलीमध्ये जुगार खेळण्याकरिता असलेल्या इसमाकडे दुचाकी वाहने, एक रिक्षा रोख रक्कम जुगारखेळण्याकरता वापरात आणलेली रक्कम जवळ बाळगलेली मोबाईल, बावनपणी पत्त्याची डाव, त्यामध्ये१) रोख रक्कम १७,१८०/ २) दुचाकी वाणी किंमत रुपये४,४५०००/३) भ्रम धोनी संच हो मोबाईल किंमत रुपये६५०००/४) जुगार साहित्य किंमत रुपये,१६,१२०/असा एकूण पाच लाख ४३ हजार ३०० रुपयेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यास तेरा जोहार खेळणाऱ्या इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा १८८७ कलम चार व पाच प्रमाणे पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर, नंबर ५९७/२०२५, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अतुल कुलकर्णी.सो. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण,मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर सो.मा.सहा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पुसई/महादेव पिसाळ, पोह/१८६ निलेश रोंगे, पोह/३५३ सुजित उबाळे, मोह कॉन्स्टेबल/२८१ शितल राऊत, पुना/१३८३ सिताराम चव्हाण यांनी पार पाडली आहे.

# घटस्थापना शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेवंती, अष्टर, गुलाब, जरबेरा, ऑर्किड, जिप्स, कामिनी, पाला लहरी इत्यादी प्रकारच्या १००० ते १२०० किलो फुलांपासून श्री विठ्ठल रुक्मिणी गाभारा, चार खांबी व नामदेव पायरी येथे आकर्षक सजावट करण्यात आली आहे. सदरची सेवा विठ्ठल भक्त राम जांभुळकर पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे. घटस्थापने निमित्त कलश प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. याशिवाय सोळखांबी येथे गुलछडी, गुलाब व शेवंती यांचे लटकन करून लावण्यात आले आहे.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये वृक्षलागवड मोहीम संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या मार्गदर्शनाखाली गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट् संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी वृक्षलागवड मोहीम राबविण्यात आली.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या वृक्षलागवड मोहिमेत महाविद्यालयाच्या परिसरात तसेच आजूबाजूच्या क्षेत्रात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. यामध्ये आंबा, चिंच, बोर, वड, लिंब, अशाप्रकारची एकूण १५५ झाडे लावण्यात आली.

या मोहिमेची सुरवात प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. राजकुमार कदम यांच्या हस्ते एक झाड लावून करण्यात आली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.अमोल चौंडे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती तसेच राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

वृक्षलागवडीमुळे महाविद्यालय परिसर हिरवागार होऊन पर्यावरण संतुलन व संवर्धनाला हातभार लागणार आहे. शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील स्वेरी हिरीरीने सहभागी होऊन समाजोपयोगी कार्य नेहमीच करत असते. यामुळे सर्वत्र स्वेरीच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# कळंब तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा, गोरे यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : धाराशिव जिल्ह्यासह कळंब तालुक्यात काही दिवसापासून सुरू असलेल्या सततच्या ढगफुटी सदृश्य, व अतिवृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांचे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून अद्यापही पाऊस दररोज सुरूच असल्याने शेतकर्यांचे यामध्ये मोठे नुकसान होत आहे. यामध्ये सोयाबीन, उडीद, मूग, कांदा,ऊस यासह इतर पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी बब्रुवान गोरे यांनी दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,



सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यामुळे तात्काळ शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा कारण शेतकरी अगोदरच कर्जबाजारी आहे व अतिवृष्टीमुळे आणखीनच अडचणीत सापडला असल्याने संपूर्ण उद्ध्वस्त झाल्याची परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, तसेच शेतकऱ्यांच्या पिकाच्या नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी, नदीच्या पुरामुळे मृत्यू पावलेल्या जनावरांची आर्थिक मदत शेतकऱ्यांना देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदनावर बब्रुवान गोरे, मानव अधिकार आंदोलन चे हनुमंत पाटुळे,अण्णासाहेब फरताडे, अंगद शिंदे, बाबुराव कवडे, हनुमंत रितापुरे, सरपंच सचिन कापसे, विजय जाधव, अमोल रितापुरे,रामहरी रीतापुरे, चक्रधर रीतापुरे, प्रतिक्र रितापुरे, बापू निंबाळकर, प्रशांत जाधव,यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# निफाड येथे लोक कल्याण मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत सभागृहात केंद्र शासन पुरस्कृत प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत लोककल्याण मेळाव्याचे आयोजन उपनगराध्यक्ष अनिल कुंदे पाटील यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. सदर मेळाव्याचे उद्धाटन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. सदर मेळाव्यास निफाड शहरातील बँक व्यवस्थापक, निफाड शहरातील पथविक्रेता बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. १७/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५ या कालावधीत चालणाऱ्या लोक कल्याण मेळावा दरम्यान पथविक्रेता बांधव यांना प्रथम टप्प्याचे १५ हजार रुपये विनातारण कर्ज उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. सदरचे कर्ज एक वर्ष मुदतीत परतफेड केल्यानंतर द्वितीय टप्प्यासाठी २५ हजार रुपये व त्यानंतर तृतीय टप्प्यासाठी ५० हजार रुपये असे या योजनेमधून तीन टप्प्यांमध्ये पथविक्रेता बांधव यांना स्वनिधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून गोरगरीब पथविक्रेत्यांसाठी पीएम स्वनिधी ही योजना खूप महत्त्वाची असून निफाड शहरातील ३३९ पथविक्रेत्यांच्या कुटुंबाला आधार देण्याचं कामकाज या योजनेमुले झाले आहे. स्वनिधी योजनेबरोबरच केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या विविध योजना आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठी निफाड नगरपंचायत द्वारे आम्ही निश्चितच प्रयत्नशील राहू असे मत उपनगराध्यक्ष अनिल कुंदे यांनी व्यक्त केले. केंद्र शासनाची पी एम स्वनिधी ही एक महत्त्वकांक्षी योजना असल्याकारणाने निफाड शहरातील सर्व बँक व्यवस्थापक यांनी पथविक्रेता बांधव यांचे कर्ज प्रकरण तात्काळ मंजूर करून कर्ज वितरण करावे, सर्व लाभार्थ्यांचे प्रलबीत कर्ज प्रस्ताव लवकर निकाली काढावे अशा बँकाना सूचना दिल्या. केंद्र शासनाच्या पी एम स्वनिधी योजनेअंतर्गत निफाड शहरातील ३३९ लाभार्थ्यांना टप्प्याचे १० हजारचे यापूर्वी साधारणपणे ३३.९० लक्ष रुपये चे कर्ज वितरण करण्यात आले असून यापुढे यापुढे देखील या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. निफाड शहरातील जास्तीत जास्त पथविक्रेता बांधव यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा व आपला व्यवसाय वृद्धिगत करून कुटुंबास आर्थिक दृष्ट्या सक्षम करावे असे आवाहन मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी केले.




शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव यांनी लोक कल्याण मेळाव्या बाबत प्रास्ताविक केले. केंद्र शासनाने पी एम स्वनिधी योजनेला ३१ मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून देण्यात आले असून सदर योजनेत १५ हजार २५ हजार व ५० हजार असा बदल करण्यात आलेला आहे. यापूर्वी सदर योजनेत १० हजार २० हजार व ५० हजार असा लाभ दिला जात होता. प्रथम टप्प्याचे कर्ज घेतलेल्या सर्व पथविक्रेत्यांचे सामाजिक आर्थिक प्रोफाइलिंग करण्याचे कामकाज विविध सामाजिक सुरक्षितता योजना लिंकेज करण्याचे कामकाज चालू असल्याची माहिती अनिल जाधव यांनी दिली. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नगर परिषदेचे पाणीपुरवठा अभियंता अनिल गंदमवाड, कर अधिकारी शरद बोडके, लेखापाल मुकुंद शिंदे, शरद काकुळते, शहर समन्वयक प्रवीण पठाडे, प्रमोद शिंदे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सिद्धेश्वर टिळे, बँक ऑफ इंडिया चे स्वप्निल कर्डिले, कॅनरा बँकेचे श्री गवळी यांचे सह पथविक्रेता बांधव, महिला बचत गटातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठोकडे परिवाराच्या हस्ते कमला भवानी मंदिरामध्ये विधिवत घटस्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील प्रसिद्ध कमलाभवानी मंदिरामध्ये सोमवारी रोजी सकाळी नऊ वाजता तहसीलदार शिल्पा ठोकडे व त्यांच्या पतीच्या हस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. त्यानिमित्ताने श्री कमला भवानीला चंदन मळवट भरण्यात आला, व निरनिराळी आभूषणे परिणाम करण्यात आली, सोनेरी रंगाचा भरजरी शालू नेसण्यात येऊन पूजा मांडण्यात आली, भवानी मातेला मानकरी फुलारी परिवाराकडून अर्पण करण्यात येणारी झेंडूच्या फुलांची मंडळी परिधान करण्यात आली,



घटवर झेंडूचे फुलांची माळ चढवण्यात आली, भवानी मातेच्या हातामध्ये तलवार व त्रिशूल देण्यात आले, आजची पूजा रोहित पुजारी यांनी मांडली यानंतर आरती सोहळा संपन्न झाला, आरती सोहळा संपन्न झाल्यानंतर पंचायतन देवतांची घटस्थापना अभय त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सुशील राठोड, बापूराव पुजारी, दादासाहेब पुजारी, विजय पुजारी, रत्नदीप पुजारी, रामदास सोरटे, भारत सोरटे, तुकाराम सोरटे, प्रकाश सोरटे, रंगनाथ पुराणिक, यांच्यासह मानकरी अभिषेक फुलारी बबन दिवटे प्रमोद गायकवाड मनोज जमादार राजेंद्र शिंदे, पद्माकर सूर्य पुजारी, ईश्वर पवार, शितल पवार, हनुमंत पवार, लक्ष्मण हवालदार, रमेश येळवणे, शीलाताई गोमे, तीन तास एक इत्यादी सेवेकरी उपस्थित होते यावेळी करमाळा परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भिवंडीत कृषी युरियाचा काळाबाजार उघड

## १ कोटी, २८ लाख, ३१ हजार,७३६ रुपयाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात अनुदानित कृषी युरियाचा काळाबाजार उघडकीस आला असून औद्योगिक वापरासाठी तस्करी करणाऱ्यांवर ठाणे जिल्हा कृषी विभागाच्या गुण नियंत्रण शाखेने व पडघा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या छाप्यात तब्बल १ कोटी २८ लाख ३१ हजार ७३६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २० सप्टेंबर २०२५ रोजी कुरुंद येथील के-स्कवेर लॉजिस्टिक पार्क मधील गोडाऊनवर ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईचे नेतृत्व तालुकास्तरीय गुण नियंत्रण निरीक्षक विवेक दोंदे यांनी केले. संपूर्ण मोहिम विभागीय कृषी सहसंचालक शिवाजी आमले, अधीक्षक कृषी अधिकारी बालाजी ताटे, जिल्हा कृषी अधिकारी रामेश्वर पाचे आणि गुण नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच पडघा पोलिसांच्या मदतीने राबवण्यात आली.

पोलिसांनी संशयावरून दोन अशोक लेलँड ट्रक अडवले असता युरिया सदृश्य खत आढळले. चौकशीत हे खत कुरुंद लॉजिस्टिक पार्कमधील गोडाऊनमधून भरल्याचे उघड झाले. त्यानंतर गोडाऊनमध्ये छापा टाकून ९ कामगार अनुदानित

**कुरुंद लॉजिस्टिक पार्कवर कृषी विभाग व पडघा पोलिसांचा छापा; १६ जणांविरोधात गुन्हा, ९ जणांना अटक**

कृषी युरियाचे औद्योगिक दर्जाच्या टेक्निकल ग्रेड युरियामध्ये री-पॅकिंग करत असल्याचे निदर्शनास आले.

छाप्यात १२१७ गोण्या औद्योगिक युरिया, ५१ गोण्या कृषी उपयोगी युरिया, तसेच १४०० गोण्या संशयित टेक्निकल ग्रेड युरिया, रिकाम्या गोण्या, शिलाई मशीन, नायलॉन दोरी, तसेच दोन ट्रक असा सर्व मिळून १ कोटी २८ लाख ३१ हजार ७३६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.






या प्रकरणी एकूण १६ जणांविरोधात खत नियंत्रण आदेश १९८५, खत वाहतूक नियंत्रण आदेश १९७३, जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून ९ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. उर्वरित आरोपी फरार असून पडघा पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

हा प्रकार म्हणजे शासनाच्या अनुदानित खताची तस्करी करून औद्योगिक क्षेत्रात विक्री करून प्रचंड नफा कमविण्याचा संगनमताने राबवलेला घोटाळा असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# अतिवृष्टीमुळे पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : राज्यभरात परतीच्या मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील गावांमध्ये सततच्या होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पंढरपूर तालुक्यातील बोहाळी उंबरगाव परिसरास रविवारी रात्री पावसाने झोडपून काढले. या परिसरातील ओढे , नाले ओसंडून वाहू लागले.



तरीही हजारो एकर पिकातून पाणी साठून राहिले. या परिस्थितीची पाहणी संवेदनशील व कर्तव्यदक्ष आ. समाधान आवताडे यांनी सोमवारी सकाळी केली. त्यांच्यासमवेत तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे ,महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकारी सोबत होते.

पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव, बोहाळी येथे भेट देऊन अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ऊस, डाळिंब, बोर, मका यासह इतर शेती पिकांची पाहणी केली. याप्रसंगी आ. समाधान आवताडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून परिस्थिती जाणून घेतली.

आ. समाधान आवताडे यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेती पिके व फळबागांचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवण्याच्या सूचना सोबत असलेल्या तहसीलदारांना केल्या.

आ. समाधान आवताडे यांच्या गाड्यांचा ताफा , जसा जसा पुढे जात होता, तसं तसे शेतकरी रस्त्यावर येऊन उभा राहत होते. शेत पिकांचे झालेले नुकसान दाखवत होते. ओढ्यातून पाणी ओव्हरफ्लो झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांमधून साठले होते. या सर्व परिस्थितीची पाहणी आ. समाधान अवताडे यांनी केली. उंबरगाव आणि बोहाळी येथील काही शेतकऱ्यांच्या घरामध्ये पाणी घुसले होते, याबाबत तहसीलदारांना पंचनामे करण्याचे आदेश दिले.

**आ. समाधान आवताडे यांनी केली पाहणी**

# अजित मल्टीस्टेट संस्थेचा कारभार सहकार खात्याच्या नियमानुसारच : अशोक टेकवडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : अजित मल्टीस्टेट संस्थेचा संस्थेचा कारभार सहकार खात्याच्या नियमा प्रमाणेचं सुरु असून , संस्थेने कोणतेही चूकीचे काम केले नाही, अशी माहिती अजित मल्टीस्टेट को- ऑपरेटिव्ह संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अशोक टेकवडे यांनी दिली,

शिरुर पोलीस स्टेशन येथे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार अशोक टेकवडे यांच्यासह ११ व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, याबाबत संस्थेचा कारभार हा पारदर्शक व सहकार खात्याच्या नियमा प्रमाणेचं सुरु आहे याबाबत स्पष्टीकरण देताना टेकवडे यांनी सांगितले.



अजित मल्टीस्टेट संस्थेकडून गुळाचा व्यवसाय सुरु करण्यासाठी संबंधित व्यक्तींनी कर्ज घेतले होते, परंतु दोन वर्षातचं कर्ज फेडण्यास ते अपयशी ठरले, संस्थेच्या नियमाप्रमाणे व सहकार खात्याच्या नियमला अधिन राहून त्यांना नोटीसा बजावल्या, त्यांच्या जमिनीच्या निवासाची प्रक्रिया सुरु झाली आहे, कर्जदारांनी थकबाकी न भरल्याने, संस्थेला जामीनदारा पर्यंत पोहोचावे लागते, या प्रक्रियेतुन सुटका व्हावी किंवा त्यास बगल देण्यासाठी, कर्जदारांनी न्यायालयाचा हा मार्ग स्वीकारला असावा ,अद्याप या संदर्भात संस्थेला न्यायालयाकडून कोणतीही नोटीस प्राप्त झाली नाही, सध्या संस्थेचा कायदा विभाग या प्रकरणाची चौकशी करीत असून, संस्थेचा कारभार हा पारदर्शक व सहकार खात्याच्या नियमानुसार सुरु आहे, संस्थेचे कर्मचारी व अधिकारी यांनी वसूली नियमा प्रमाणे केली आहे, संस्थेला कोणतीही नोटीस प्राप्त न झाल्याने संस्थेचे म्हणणे मांडता आले नाही, त्यामुळे वरिष्ठ न्यायालयात जावून दाद मागितली जाईल, यापूर्वी कर्जदार यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती, परंतु न्यायालयाने त्यांचे म्हणणे फेटाळले असल्याचे ही टेकवडे यांनी सांगितले.

# विक्रोळी हनुमान नगर सोसायटी येथील धोकादायक नाल्याचे काम त्वरित सुरु करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विक्रोळी/केतन भोज) : हनुमान दर्शन हनुमान नगर सोसायटी पार्कसाईट,विक्रोळी पश्चिम येथे असलेला मोठा धोकादायक नाला पूर्णपणे खचला असून या नाल्याला पूर्णपणे तडे गेले आहेत.त्यामुळे हा नाला कोणत्याही स्थितीत कोसळण्याची शक्यता आहे.

येथील विविध स्थानिक सोसायट्यांना जोडणाऱ्या या नाल्यावरून रोज हजारो लोक येजा करत असतात.तसेच जवळच याठिकाणी शाळा देखील आहेत.त्यामुळे शाळकरी विद्यार्थी ही याठिकाणांहून जात येत असतात.तसेच हा मुख्य मोठा नाला संपूर्णरित्या खचला असून तो कधीही कोसळू शकतो.तसेच संबंधित मनपा एन विभागाचे अधिकारी यांनी या धोकादायक नाल्याची पाहणी देखील केली आहे.

वांरवार या संबंधित पाठपुरावा करून देखील अद्याप ही काम सुरू न झाल्यामुळे मनपा एन विभाग हे याठिकाणी कोणती जीवितहानी होण्याची वाट बघत आहे का?असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.

त्यामुळे लवकरात लवकर संबंधित मनपा एन विभागाने या नाल्याचे बांधकाम सुरू करावे अशी मागणी येथील स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्ते प्रवीण धुमाळ,तुषार निर्मल,किशोर चौनाल यांनीही केली आहे.



# पत्रकारांवरील हल्ल्याचा निफाडमध्ये निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : त्र्यंबकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ केंद्र जवळ त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या नावाने कर वसुली करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी पत्रकारांना दगड, काठया आणि छत्रीने मारहाण केले. यामध्ये पत्रकार किरण ताजणे योगेश खरे अभिजीत सोनवणे गंभीर जखमी झाले असून या घटनेचा निफाड पत्रकार बांधवांच्या वतीने पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कठोरातील कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आले आहे. याप्रसंगी पत्रकार राहुल दवते, राजेंद्र थोरात, अमोल जाधव, योगेश कर्डिले, राहुल कुलकर्णी, आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत करावी : रिपाइं(आठवले)ची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यात परतीच्या पावसाने अतिवृष्टी होऊन शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान झाले असून या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा त्वरित पिक पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी या प्रमुख मागणी सह अन्य विविध जिव्हाळ्याच्या मागण्या रिपब्लिकन पार्टी इंडिया (आठवले) च्या वतीने तहसिलदार तुळजापूर यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शहर शाखा तुळजापूरच्या वतीने तुळजापूर तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की तुळजापूर तालुक्यात व परिसरात सर्वत्र परतीच्या पावसाने गेल्या आठ पंधरा दिवसापासून धुमाकूळ घातला असून अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे फार मोठे नुकसान झाले आहे तेव्हा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिक पंचनामा त्वरित करून त्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी त्याच प्रमाणे संजय गांधी,इंदिरा गांधी, श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना त्यांचे मानधन त्वरीत वाटप करावे,तसेच



भूमिहीन शेतकरी कुटुंबाला रेशन त्वरित वाटप करावे, त्याचप्रमाणे मागासवर्गीयाना जातीचे दाखले मिळण्यासाठी घालण्यात आलेल्या जाचक अटी रद्द करून त्यांना त्वरित जातीचे दाखले द्यावेत,तसेच शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्यांना,भोगवटधारकाना त्यांच्या नावे घर जागा करून त्यांना रमाई आवास पंतप्रधान आवास व इतर योजनेतून घरकुलाचा लाभ देवून घरकुल बांधून देण्यात यावे,आदीसह विविध .मागण्या त्वरीत मंजूर कराव्यात.

रिपाइं (आठवले) च्या वतीने तुळजापूर तहसिलदार याना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के,तुळजापूर शहराध्यक्ष वैजनाथ पांडागळे, तालुका उपाध्यक्ष किसन पांडागळे,रिपाइंचे महादेव जेटीथोर, लहू घोडके, प्रविण मस्के, रामु राठोड सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

**सरचिटणीसपदी सागर सुरवसे तर खजिनदारपदी किरण बनसोडे यांची फेरनिवड**

**सोलापूर श्रमिक पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा**

# सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी तेराव्यांदा विक्रम खेलबुडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी तेराव्यांदा विक्रम खेलबुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी सागर सुरवसे यांची तर खजिनदारपदी किरण बनसोडे या दोघांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी २१ सप्टेंबर रोजी संघाच्या कार्यालयात विक्रम खेलबुडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. प्रारंभी सरचिटणीस सागर सुरवसे यांनी मागील वर्षाच्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले, त्यास मंजुरी देण्यात आली. त्यानंतर खजिनदार किरण बनसोडे यांनी वार्षिक जमा- खर्च सादर केला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

अध्यक्ष पदासाठी पुन्हा विक्रम खेलबुडे यांची बिनविरोध निवड करण्याची सूचना किरण बनसोडे यांनी मांडली तर त्यास आप्पासाहेब पाटील यांनी अनुमोदन दिले. विक्रम खेलबुडे यांनी तेराव्यांदा अध्यक्षपदी विराजमान होत नवा इतिहास घडविला.

सर्वांनी टाकलेल्या विश्वासास पात्र राहून काम करणार असल्याची ग्वाही नूतन अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी दिली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार देशपांडे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पत्रकार अनिल कदम यांनी काम पाहिले. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सकाळचे सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील, तरुण भारतचे निवासी संपादक विजयकुमार देशपांडे, पुढारीचे निवासी संपादक संजय पाठक, माजी अध्यक्ष प्रशांत जोशी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, इन सोलापूरचे चॅनेल प्रमुख समाधान वाघमोडे, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.आमदार विजयकुमार देशमुख यांनीही नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.



विक्रम खेलबुडे



सागर सुरवसे



किरण बनसोडे

नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष : विक्रम पाठक, आप्पासाहेब पाटील, उमेश कदम, आफताब शेख, नितीन पात्रे, चिटणीस : संगमेश जेऊरे, भरतकुमार मोरे, कालिदास मासाळ, मिलिंद राऊळ,

सहचिटणीस : बळीराम सर्वगोड, दीपक सोमा, अविनाश गायकवाड,

सदस्य : विजयकुमार राजापुरे , अनिल कदम, माधवी कुलकर्णी, व्यंकटेश दोंता, बाळकृष्ण दोड्डी,प्रभूलिंग वारशेट्टी, विठ्ठल आहेरवाडी,रामदास काटकर, प्रीतम पंडित, गौतम गायकवाड, अमोल साळुंखे, विकास चाटी, सचिन जाधव, विकास कस्तुरे , संदीप येरवडे, , मुजम्मिल शहानुरकर, श्रीनिवास मावनूर, सुदर्शन भालेराव.

सल्लागार -नारायण कारंजकर, जयप्रकाश अभंगे, चंद्रशेखर कव्हेकर

यांच्या अभिनंदनाचा ठराव

पत्रकार गृहनिर्माण प्रकल्पाच्या बाह्य सुविधांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सात कोटीचा निधी दिल्याबद्दल तसेच या कामी सहकार्य केल्याबद्दल शिवसेना शिंदे गटाच्या राज्य प्रवक्ता प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या तसेच शिखर पहारिया फाऊंडेशनने श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालय नूतनीकरणासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव या सभेत करण्यात आला.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वोतोपरी मदत

## पालकमंत्री जयकुमार गोरे; सांगोला तालुक्यातील पूरपरिस्थितीची केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पालकमंत्री जयकुमार गोरे

पंढरपूर-अतिवृष्टीमुळे सांगोला तालुक्यातील मंडळाच्या ६ मंडळातील गावांमध्ये शेतपीक, फळपीक, बंधारे, रस्ते, घरे, पुलांचे नुकसान झाले आहे. आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानीच्या मदतीपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वोतोपरी मदत दिली जाईल अशी ग्वाही ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.





अतिवृष्टीमुळे सांगोला तालुक्यातील महिम, येथील वाहून गेलेल्या पुलाची, तसेच महूद वाकीशिवणे,कडलास येथील घरे, शेतीचे झालेल्या नुकसानीची पालकमंत्री श्री. गोरे यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,प्रांताधिकारी अमित माळी, तहसीलदार संतोष कणसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी लांडगे, गटविकास अधिकारी उमेश कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री गोरे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतपिकांचे, घरांचे तसेच सार्वजनिक मालमत्तांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या आहेत.

महिम येथे अतिवृष्टी झाल्याने दोन मुले वाहून गेली होती. त्या ऐवळे कुटुंबीयांना आवश्यक ती मदत करण्यात येईल. महिम येथे अरुंद पूल असून पुलाच्या रुंदीकरणाचे काम संबंधित विभागाने तात्काळ करावे. कडलास येथे ढगफुटी झाल्याने कोळी बांधवांच्या राहत्या घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले असून, ज्यांना आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले आहेत त्यांची कामे तात्काळ सुरू करावीत तसेच ज्यांना जागा उपलब्ध नाहीत त्यांना जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना ही यावेळी त्यांनी दिल्या.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी करताना पालकमंत्री गोरे यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी, गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना धीर दिला. तसेच शासन पूर्णपणे आपल्या पाठीशी असून शासनतर्फे नुकसानी संदर्भात लवकरच मदत दिली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले.


---

# शेलू येथील रात्रीच्या पावसाने झालेल्या नुकसानीची त्वरित पंचनामे करा

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा तालुक्यातील शेलू येथे काल रात्री ढगफुटी झाली असून शेतकरी सध्या अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहेत. परतीच्या पावसामुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे पिकं उध्वस्त झाली आहेत, आर्थिक परिस्थिती ढासळली आहे, आणि जगण्याचा लढा अधिक तीव्र झाला आहे. शेलू येथील गंगाधर एखंडे यांच्या शेतातील कपाशी पूर्ण वाहून गेली व नाल्याना मोठं बोगदाड पडलं, अप्पासाहेब एखंडे यांच्या नेट मिरची पिकासाहीत संपूर्ण नुस्कान झाले, धोंडीराम एखंडे यांचा छोटा हत्ती वाहन पुरात वाहून गेला, राजेभाऊ रंधवे यांच्या कपाशीत पूर्ण झाले असून त्यांनी त्या पाण्यात सरकारला साकडं घातलं, रोहित एखंडे याच्या कपाशी पूर्ण पणे बुडासहित वाहून गेली, विष्णू एखंडे यांच्या शेतात तलावतील व नाल्यातील दगड वाहून आले कपाशीचे पूर्ण नुकसान झाले भोसा येथील बाळासाहेब शेळके यांच्या कपाशी मध्ये पूर्ण पाणी झाली आणि नदीच्या कडेला शेत भोगदा पडला यांच्या सह अनेक शेतकऱ्याचे पिकांचे नुकसान झाले असून त्यांना आर्थिक मदत करून सरसगट ओला दुष्काळ जाहीर करा

**नूकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे शासनाला साकडे**



या संकटकाळात सरकारने तातडीने हस्तक्षेप करून ओला दुष्काळ जाहीर करणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ पंचनामे सुरू असल्याची माहिती देणे हे अपुरे आहे आणि याला तात्कालिक कारवाईची जोड दिली गेली पाहिजे. पंचनामे हे नाट्य नव्हे, उत्तरदायित्वाची प्रक्रिया असावी, जनतेचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न थांबवा दरवेळी संकटाच्या वेळी सामाजिक, जातीय किंवा इतर चर्चांनी जनतेचं लक्ष भरकटवण्याचा प्रयत्न केला जातो. ही जुनी पद्धत आता चालणार नाही. शेतकरी, त्यांची पिढी आणि त्यांची पुढची पिढीही आता सजग आहे, जागरूक आहे आणि प्रश्न विचारायला शिकलेली आहे.

जर सरकारकडून यावर गांभीर्याने पावले उचलली गेली नाहीत, तर शेतकऱ्यांमध्ये रोष वाढेल. ही नाराजी पुढे जाऊन तीव्र आंदोलनाचे रूप घेऊ शकते. शेतकऱ्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहणे कुणालाही परवडणारे ठरणार नाही.शेतकरी वाचला, तर देश वाचेल. शेतकऱ्यांचे प्रश्न हे राजकीय नव्हे, तर मानवी अस्तित्वाचे प्रश्न आहेत.

सरकारने ही बाब गांभीर्याने घ्यावी आणि तात्काळ उपाय करा अशी आस शेलू येथील सर्व शेतकऱ्यांना लागली आहे.

**शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन**

---

# शेतजमिनी घरे रस्ते पाण्याखालीच, मुसळधार पावसाने औसा तालुका ठप्प ; नुकसानग्रस्ताना मदत नाही

औसा प्रतिनिधी /अमर जाधव

औसा तालुक्यात गेल्या २४ तासांमध्ये अतिवृष्टी झाली आहे महापुराची परिस्थिती निर्माण झाली आहे औसा तालुक्यातील ढगफुटी दृश्य पावसामुळे मुख्य रस्ते किल्लारी गुबाळ मंगरूळ नांदुर्गा जवळगा मातोळा सारणी नागरसोगा हरेगाव लिंबाळा रस्ते पूर्ण पाण्याखाली आहेत गावोगावी संपर्क तुटलेला आहे पूर्ण गावांमध्ये बाजार तळावर पाणी शिरले आहे घरामध्ये पाणी शिरले आहे पाणी काढण्यात रात्र जागून काढावी लागते पीके खरडून गेली असून शेतजमी सुद्धा पुराच्या पाण्यात वाहून गेली आहेत औसा तालुक्याला लागूनच लोहारा



तालुक्यातील निम्मत तेरणा ओव्हरफुल झाल्यामुळे नदीच्या पाण्यामुळे सारणी गुबाळ किल्लारी मंगरूळ गांजखेडा शिवारातील शेतातील पिके खरडून गेली आहेत ग्रामीण भागातील रस्त्याची नुकसान झाल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाले आहे

रात्रीच्या पावसामुळे शेतकरी सध्या अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहेत परतीच्या पावसामुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे शेतकऱ्यांची पीक उध्वस्त झाले आहेत आर्थिक परिस्थिती ढासळली आहे आणि जगण्याचा लढा अधिक तीव्र झाला आहे

---

# तुळजापूरहून आलेल्या पवित्र ज्योतीचे मंगळवेढ्यात अनिल सावंत यांच्या हस्ते स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवार शहर व तालुक्यात सुरू होणाऱ्या नवरात्र महोत्सवासाठी तुळजापूरहून आलेल्या पवित्र ज्योतीचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. हा स्वागत सोहळा मंगळा सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या टोलनाक्याजवळ पार पडला. व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) व तसेच मा. अनिल ( दादा )सावंत फाउंडेशन पंढरपूर- मंगळवेढा यांच्या वतीने करण्यात आले. स्वागताचे सौभाग्य भैरवनाथ उद्योग समूहाचे उपाध्यक्ष अनिल (दादा ) सावंत यांच्या हस्ते पार पडले.



कार्यक्रमाला शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, मतदारसंघ अध्यक्ष संतोष रंधवे, तालुका कार्याध्यक्ष माणिक गुंगे, युवक शहराध्यक्ष जमीर इनामदार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंडळाच्या प्रमुखांचे सत्कार करण्यात आले तसेच उपस्थित पदाधिकारी व भाविकांसाठी फराळ म्हणून शाबू खिचडी व चहापाण्याची वाटप करण्यात आले मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यातील दीडशेहून अधिक मंडळांनी या स्वागत सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रमाला उत्साही रंग चढवला यावेळी बोलताना उपाध्यक्ष अनिल दादा सावंत म्हणाले यांना निसर्गाने तालुक्यातील शेतकऱ्यांवर मोठा खूप केला आहे. तरीही नवरात्र महोत्सव मंडळाने शांततेत आणि उत्साहाने देवीची स्थापना करून सामाजिक व धार्मिक प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करावेत उत्साहाला कुठलेही गालबोट लागू नये तसेच धार्मिक तेढ निर्माण होईल असे कार्यक्रम टाळावेत त्यांनी सर्वांना शारदीय नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा देत सौदा पूर्ण वातावरण राखण्याची आव्हान केले. मंगळा तालुक्यात नवरात्र महोत्सवाची सुरुवात अशा उत्साही व भक्तिमय वातावरणात झाले असून भाविकांमध्ये आपार आनंदाचे वातावरण आहे.

**नागरिकांची होतेय ससेहोलपट**

---

# अंत्रीखेडेकर येथील ग्राम महसूल अधिकारी सातत्याने गैरहजर राहत असल्याने नागरीक त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मौजे मेरा खुर्द मंडळातील असोला बुद्रुक आणि अंत्री खेडेकर येथील शेतकरी महसूल अधिकारी विजय खरात यांच्यापासून त्रस्त आहेत त्यांना भेटण्यासाठी अंत्री खेडेकर आसोला येथील शेतकऱ्यांचा दिवस दिवस वाट पहावी लागते तरीपण महसुलाधिकारी हे मुख्यालय अंत्रीखेडेकर येत नाही चिखली येथुन कारभार पाहतात त्यांच्याकडे महसूल विषयाचे काम दिले तर ते सुद्धा दोन दोन तीन तीन महिने होत नाही अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे वारसाच्या फेर दिली आहेत्याचे सुद्धा काम झाले नाही काही शेतकरी त्यांच्याकडे महसूल महसूल विषयी काम घेऊन गेले असता शेतकऱ्यांना ते उडवा उडवीचे उत्तरे देतात अंत्री खेडेकर येथील अनेक वारसाची नोंद करण्यासाठी मागील तीन महिन्यापासून त्रस्त आहे अजून पर्यंत त्यांची वारसाची नोंद झाली नाही असे अनेक शेतकरी आहेत की ते त्यांच्या शेती विषयीचे कामापासून त्रस्त आहेत अंत्री खेडेकर येथील एक विधवा महिलेची फाईल महसुलाधिकारी विजय खरात यांच्याकडे दिली आहे परंतु त्याची सुद्धा त्यांनी वारस अजून पर्यंत लावलेले नाही.




सदर महसुलाधिकारी हे यांचे दलालामार्फत चे काम वेळेवर करतात अशी सुद्धा असोला बुद्रुक आणि अंत्री खेडेकर येथे चर्चा आहे आज चिखली तालुक्याचा महसूल विभागाचा तहसीलदार संतोष काकडे यांचा जिंवत सातबारा हे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवगत केले आहे परंतु अंत्री खेडेकर असोला बुद्रुक येथील कामचुकार महसुल अधिकाऱ्यामुळे चिखली तालुक्याचे तहसील चे नाव खराब करणयाचे काम महसुल अधिकारी विजय खरात करत आहे चिखली महसूल विभागाचे नाव चिखली तालुका म्हटलं की संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गर्वाने घेतल्या जात आहे.

परंतु कामचुकार महसूल अधिकारी विजय खरात यांच्या प्रताप मुळे महसूल विभागाला काळा डाग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही आज शालेय विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले लागतात ते सुद्धा वेळेवर मिळत नाही तसेच काही लोकांना वैद्यकीय कामासाठी दाखले लागतात परंतु कामचूकर महसूल अधिकारी हे वेळेवर येत नाही.

अंत्रीखेडेकर व आसोला येथे लोक दिवस दिवस वाट पाहतात परंतु महसूल अधिकारी हे त्याना भेटत नाही आणि महसूल अधिकारी आपला दूरध्वनी सुद्धा बंद करून ठेवतात त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना चिखली येथे रिकाम्याच फेऱ्या माराव लागत आहे त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान सुद्धा होत आहे याकडे माननीय तहसीलदार साहेब कोणत्या प्रकारे लक्ष देऊन निफ्टर करतात याकडेच सध्या सर्व असोला बुद्रुक आणि अंत्री खेडेकर येथील शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे जर माननीय तहसीलदार साहेब यांनी तक्रारीची दखल घेतली नाही तर अंत्री खेडेकर वाशी आणि असला बुद्रुक वाशी हे उपोषणाचा पवित्र कधीही घेऊ शकतात.

---

# नवरात्र महोत्सवनिमित्त श्री विठ्ठल, रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली





रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री विठ्ठलास देखील नेहमी प्रमाणे सोने मुकुट, कौस्तुक मणी, मोत्याचा तुरा, नाम, दंडपेठ्या मोठा जोड, हि-यांचा कंगण जोड, एक पदरी मोत्याची कंठी, लहान-मोठा शिरपेच, मत्सजोड, हायकोल, मोहन माळ, पुतळ्यांची व मोहरांची माळ, एकदाणी, तोडेजोड, तुळशी माळ, हायकोल इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

**पारंपारिक कार्यक्रमांसह महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण**

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. सदरचे अलंकार पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. तसेच सभामंडपातील पारंपारिक कार्यक्रमा शिवाय महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण झालेले आहे.

नवरात्र उत्सवातील भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिरात पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.